गुरुवार दि. ०९ जुलै २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३०८ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४

8390098886 | yuva.aadarsh@gmail.com | 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ | https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ | https://twitter.com/Yuva_aadarshjln/ | RNI: MAHMAR/2019/78282

### व्यवसायावरील वाढत्या करांच्या बोजावर मराठवाडा चेंबरची चिंता; जालन्यात संचालक मंडळाची बैठक

## व्यापारी हितासाठी लढा तीव्र करण्याचा निर्धार

### आस्थापना कर, सोलार ग्रीड सपोर्टिंग चार्ज आणि व्यवसाय कराविरोधात सरकारचे लक्ष वेधणार

**जालना -प्रतिनिधी**

मराठवाड्यातील सर्व व्यापारी संघटनांची शीर्ष संघटना मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्सची सहावी संचालक मंडळाची बैठक जालना शहरातील विजय विलास हॉटेल येथे सोमवारी मराठवाडा चेंबरचे अध्यक्ष आदेशपाल सिंग छाबडा यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. बैठकीच्या सुरुवातीस मराठवाडा चेंबरचे महासचिव शाम लोया यांनी मागील बैठकीचे इतिवृत्त वाचून दाखवले व त्याला मान्यता घेतली. तसेच कोषाध्यक्ष विकास साहूजी यांनी चेंबरचे आर्थिक ताळेबंद सादर केले व त्यास मान्यता घेतली. बैठकीत व्यवसायातील समस्या व कराचा बोजा याविषयी गंभीरतेने चर्चा करून या विषयाकडे सरकारचे लक्ष वेधण्याचे या बैठकीत ठरविण्यात आले. महापालिका व नगरपालिका आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी सरकार त्यांना व्यापारी वर्गावर व जनतेवर आस्थापना कराच्या माध्यमातून नवीन कर लादण्याचा पुढील काळात प्रयत्न होणार आहे. महापालिकेच्या स्थापना करास व्यापारी



संघटनेच्या माध्यमातून विरोध करण्याचा ठराव धर्माबाद येथे मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्स च्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित व्यापार परिषदेत पास करून घेण्याचे बैठकीत ठरविण्यात आले. तसेच केंद्र सरकार व राज्य सरकार ग्रीन एनर्जीला प्रोत्साहन देत असताना सुद्धा महावितरण आस्थापनावर किंवा घरावर लावलेल्या सोलार एनर्जी सिस्टीम द्वारे उत्पन्न झालेल्या विद्युत युनिटवर ग्रीड सपोर्टिंग चार्ज १ रुपया ९२ पैसे प्रमाणे सोलार बसवणाऱ्या ग्राहकास आकारत असल्यामुळे व्यापारी वर्गाचे आर्थिक कंबरडे मोडले आहे. व्यापारी वर्गाला विश्वासात न घेता महावितरण ने लावलेल्या या ग्रीड सपोर्टिंग चार्जेस बद्दल सरकारला जाब विचारण्याचे काम मराठवाडा चेंबर (पान २ वर)

### धर्माबादेत २६ जुलैला व्यापार परिषद

धर्माबाद येथे मराठवाडा चेंबरच्या २९ व्या वर्धापन दिनानिमित्त २६ जुलै रविवार रोजी भव्य व्यापार परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यास मराठवाड्यातील सर्व व्यापाऱ्यांनी उपस्थित राहून व्यापारी वर्गाची एकजूट दाखवावी असेही आवाहन मराठवाडा चेंबरच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## थायरॉईड विरुद्ध अभियानात मोफत १० हजार निदान चाचण्यांचा टप्पा पार

### बगडिया चॅरिटेबल ट्रस्ट व रोटरी रेनबोची वर्षभरात शंभर शिबिरातून संकल्पपूर्ती-डॉ. राजेश सेठीया

**जालना - प्रतिनिधी**

सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या मोफत १० हजार थायरॉईड निदान चाचण्या या महत्त्वाकांक्षी अभियानाने आपले उद्दिष्ट यशस्वीरित्या पूर्ण केले आहे. या अभियानामुळे हजारो नागरिकांना वेळेत निदानाची संधी मिळाली असून, समाजात थायरॉईडविषयी मोठी जनजागृती निर्माण झाली आहे, अशी माहिती प्रकल्प प्रमुख तथा रुबी हॉस्पिटलचे संचालक डॉ. राजेश सेठीया यांनी दिली.

बगडिया ट्रस्टचे अध्यक्ष पन्नालाल बगडिया यांच्या संकल्पनेतून




रोटरी क्लब ऑफ जालनाच्यावतीने डॉ. राजेश सेठीया यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण वर्षभरात विविध शाळा, महाविद्यालये, औद्योगिक वसाहती, सामाजिक संस्था, हॉस्पिटल्स, मंदिरे, गुरुद्वारा, चर्च, पोलीस प्रशिक्षण विद्यालय, विविध वस्त्या आणि ग्रामीण भागांत सातत्याने शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. गतवर्षी रोटरी प्रांतात अबकी बार एक लाख पार हे मधुमेह निदान अभियान राबवले गेले होते. त्यात तब्बल दीड लाख चाचण्या मोफत करण्यात आल्या होत्या. त्यामध्येही बगडिया ट्रस्टचे विशेष योगदान लाभले होते. यावर्षी बगडिया ट्रस्ट आणि रोटरी रेनबोच्या संयुक्त विद्यमाने मोफत फुफ्फुस तपासणी अभियान राबविण्यात येणार असल्याचे डॉ. सेठीया यांनी सांगितले.

### आता मोफत फुफ्फुस तपासणी; अभियान-पन्नालाल बगडिया

थायरॉईडच्या चाचण्या सामान्यांसाठी खर्चिक असतात, त्यामुळे अनेकदा त्याकडे दुर्लक्ष होते. गरजू आणि अनभिज्ञ लोकांसाठी काहीतरी चांगले करावे याच भावनेतून आम्ही हे अभियान राबवले. आता यापुढील पाऊल म्हणून यावर्षी मोफत फुफ्फुस तपासणी अभियान राबविण्यात येणार आहे. आरोग्य, शिक्षण आणि समाजसेवा या क्षेत्रांत सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्टचे योगदा न यापुढेही अविरत सुरू राहील, अशी ग्वाही सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष पन्नालाल बगडिया यांनी दिली.

वेळेत निदानामुळे सुखी संसार अन् मातृत्व सुख! : वर्षभरात एकूण १० हजार २५ चाचण्या करण्यात आल्या असता, १०.५ टक्के लोकांना थायरॉईड असल्याचे निदान झाले. त्यापैकी ८ टक्के लोकांना (पान २ वर)

## पंढरपूर यात्रेसाठी थेट आगार/गावांतून आषाढी एकादशी निमित्त खास बसेस उपलब्ध

**जालना - प्रतिनिधी**

आषाढी एकादशी निमित्त पंढरपूर यात्रा दि. २० जुलै २०२६ ते दि. ३० जुलै २०२६ या कालावधीत भरणार असून यात्रेचा मुख्य दिवस (आषाढी एकादशी) दि. २५ जुलै २०२६ शनिवार हा आहे. तसेच गुरुपोर्णिमा दि. २९ जुलै २०२६ रोजी आहे. या यात्रेच्या निमित्ताने थेट गावातून पंढरपूर येथे जाणाऱ्या भाविकांसाठी राज्य परिवहन महामंडळाकडून खास रा.प. बसेस जालना विभागाकडून उपलब्ध करुन देण्याचा अभिनव उपक्रम राबविण्याचे राज्य परिवहन महामंडळाने नियोजन केले आहे. पंढरपूर यात्रेकरीता भाविक प्रवाशांनी आपल्या जवळच्या आगार प्रमुखांना प्रत्यक्ष भेटल्यास अथवा संपर्क केल्यास आपल्या गावांतून पंढरपूरसाठी जातांना व येतांना स्वतंत्रपणे रा.प.बसेस उपलब्ध करुन देण्यात येतील. यात्रेसाठी रा.प. महामंडळामार्फत देण्यात येणाऱ्या ज्येष्ठ नागरिक, महिला, अमृत ७५ वर्ष वयावरील या व इतर सर्व प्रवाशी सवलती लागू आहेत.

रा.प. महामंडळाच्या या योजनेचा खास यात्रेकरूंना मोठ्या प्रमाणात यात्रेचा फायदा होईल, खेडे गावांतील भाविकांचा प्रवास अधिक सुखकर व चांगला होण्यास मदत होईल (पान २ वर)

### विधानसभेत जालना पंचायत समितीतील भ्रष्टाचाराचा मुद्दा

## गटविकास अधिकारी संदीप पवार यांच्या निलंबनाची आ. बबनराव लोणीकर यांची मागणी

**मुंबई / जालना । प्रतिनिधी**

आज, दि. ८ जुलै २०२६ (बुधवार) रोजी महाराष्ट्र विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी जालना पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संदीप पवार यांच्याविरोधातील भ्रष्टाचाराच्या तक्रारींचा मुद्दा तारांकित प्रश्नाद्वारे उपस्थित केला. आमदार लोणीकर यांनी सभागृहात जालना पंचायत समितीच्या विविध विकासकामे आणि शासकीय योजनांच्या



अंमलबजावणीमध्ये आर्थिक अनियमितता झाल्याच्या तक्रारींची चौकशी करून दोषी आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. तसेच, चौकशी पूर्ण होईपर्यंत गटविकास अधिकारी संदीप पवार यांना निलंबित करण्यात यावे, अशी मागणीही त्यांनी सरकारकडे केली.

यावेळी ग्रामीण भागातील विकासकामे, रोजगार हमी योजना तसेच विविध आवास योजनांबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींची निष्पक्ष आणि सखोल चौकशी करण्याची आवश्यकता असल्याचे लोणीकर यांनी सभागृहात नमूद केले. शासकीय निधीचा योग्य वापर, पारदर्शकता आणि लाभार्थ्यांना न्याय मिळण्यासाठी शासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशीही त्यांनी मागणी केली.

## कन्फर्म तिकीट असूनही सीट नाकारल्याने रेल्वेला दणका: ग्राहक आयोगाकडून ₹३५,००० पेक्षा जास्त नुकसान भरपाईचा आदेश

**जालना - प्रतिनिधी**

कन्फर्म आरक्षित तिकीट असूनही प्रवाशाला आणि त्याच्या मित्रांना त्यांची जागा न मिळाल्याने उभे राहून प्रवास करावा लागल्याच्या गंभीर प्रकरणात, भोजपूर (आरा) येथील जिल्हा ग्राहक विवाद निवारण आयोगाने उत्तर मध्य रेल्वे आणि रेल्वे मंत्रालयाला सेवेतील त्रुटीसाठी दोषी ठरवले आहे. आयोगाने रेल्वेला तिकीटाची रक्कम व्याजासह परत करण्याबरोबरच मानसिक, शारीरिक आणि आर्थिक त्रासापोटी भरीव नुकसान भरपाई देण्याचे निर्देश दिले आहेत.या प्रकरणातील तक्रारदार, रवीशंकर पांडे यांनी आपल्या तीन मित्रांसह विंध्याचल येथे प्रवास केला होता. परतीच्या प्रवासासाठी त्यांनी विंध्याचल ते आरा या प्रवासाकरिता ट्रेन क्र. १३२०२ एलटीटी-पटना एक्सप्रेसमध्ये आयआरसीटीसी पोर्टलवरून चार कन्फर्म तिकिटे आरक्षित केली होती. यासाठी त्यांनी एकूण १,८७६.८० रुपये शुल्क भरले होते आणि त्यांना बी-४ या डब्यात ५८, ६२, ६३ आणि ६८ क्रमांकाच्या जागा मिळाल्या होत्या.तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, ट्रेन सुमारे एक तास उशिराने पोहोचली. मोठ्या गर्दीतून वाट काढत ते आणि त्यांचे मित्र डब्यात चढले असता, त्यांच्या आरक्षित जागांवर काही व्यक्ती बसलेल्या आढळल्या. त्यांनी स्वतःला रेल्वे कर्मचारी असल्याचे सांगून जागा खाली करण्यास नकार दिला आणि उद्धट वर्तन केले. प्रवाशांनी डब्यात टीटीई किंवा रेल्वे संरक्षण दलाच्या कर्मचाऱ्यांचा शोध घेतला, परंतु कोणीही सापडले नाही. रेल्वेची हेल्पलाइन १३९ वर संपर्क साधण्याचा प्रयत्नही अयशस्वी ठरला.यानंतर, पांडे यांनी रेल्वे सेवा पोर्टल आणि रेल्वे मंत्रालयाच्या अधिकृत सोशल मीडिया हँडलवर तक्रार दाखल केली. त्यांना तक्रार क्रमांकदेखील मिळाला, परंतु कोणतीही प्रभावी कारवाई झाली नाही. प्रवासादरम्यान एक टीटीई भेटला असता, त्यानेही गर्दीचे कारण देत मदत करण्यास असमर्थता दर्शवली. परिणामी, तक्रारदार आणि त्यांच्या मित्रांना संपूर्ण प्रवास उभ्यानेच पूर्ण करावा लागला. या प्रकारामुळे झालेल्या त्रासाविरोधात त्यांनी सेवेतील त्रुटीचा ठपका ठेवत ग्राहक आयोगाकडे धाव घेतली आणि तिकीट रकमेचा परतावा, नुकसान भरपाई व खटल्याचा खर्च मागितला.सुनावणीदरम्यान, उत्तर मध्य रेल्वे आणि रेल्वे मंत्रालयाने तक्रार निराधार असल्याचे म्हटले. कायदा आणि सुव्यवस्थेची जबाबदारी रेल्वे पोलिसांची असून, रेल्वे प्रशासनाची नाही, असा युक्तिवाद त्यांनी केला. तसेच, तक्रारीवर त्वरित कारवाई केल्याचा दावाही रेल्वेने केला. तथापि, जिल्हा ग्राहक आयोगाने रेल्वेचा युक्तिवाद फेटाळून लावला. आयोगाचे अध्यक्ष कृष्ण प्रताप सिंह आणि सदस्य कमल किशोर सिंह यांच्या खंडपीठाने नमूद केले की, प्रवाशांकडे वैध कन्फर्म तिकिटे असताना (पान २ वर)

## जालना पंचायत समितीतील कथित भ्रष्टाचारावर विधानसभेत आमदार अर्जुनराव खोतकर आक्रमक; 'डोर-टू-डोर चौकशी करा, दोषींवर निलंबनासह फौजदारी कारवाई करा'

### पंचायत समिती जालना येथील पैशाचा गलथान कारभार थांबवा आ. खोतकर यांची विधानसभेत मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**

पंचायत समितीमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध ग्रामीण विकास योजनांमधील कथित भ्रष्टाचाराचा मुद्दा आज महाराष्ट्र विधानसभेत जोरदारपणे गाजला. तसेच या प्रकरणाची लाभार्थ्यांच्या घरोघरी जाऊन (डोर-टू-डोअर) चौकशी करून दोषींवर निलंबनासह फौजदारी कारवाई करण्याची ठाम मागणी त्यांनी केली.

सभागृहात बोलताना आमदार खोतकर म्हणाले की, *''विकसित भारताचे स्वप्न साकार करायचे असेल तर ग्रामीण भागाचा विकास हा केंद्रस्थानी असला पाहिजे. विकसित भारत बघायचा असेल तर ग्रामीण भागाकडे चला असे म्हण प्रचलित आहे.

जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या या ग्रामीण विकासाच्या प्रमुख संस्था आहेत. मात्र, याच संस्थांमध्ये अधिकारी भ्रष्टाचार आणि हलगर्जीपणा करत असतील, तर शासनाने कठोर भूमिका घेणे अत्यंत आवश्यक आहे.''

**१० टक्क्यांपर्यंत कमिशनची मागणी होत असल्याचा आरोप**

आमदार खोतकर यांनी आरोप केला की, पंचायत समितीमार्फत राबविण्यात येणाऱ्या पंतप्रधान आवास योजना, रमाई घरकुल योजना, इंदिरा गांधी आवास योजना, शबरी योजना तसेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत विहिरी, पांदण रस्ते, गोठे आणि इतर विकासकामांची बिले मंजूर करण्यासाठी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संदीप पवार व तत्सम अधिकारी लाभार्थ्यांकडून १० टक्क्यांपर्यंत रकमेची मागणी केली जाते. पैसे न दिल्यास बिले अडविली जात असल्याचे अनेक तक्रारींतून समोर आले असल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

त्यांनी पुढे सांगितले की, दलित वस्ती, तांडा वस्ती, धनगर वस्ती तसेच विविध घरकुल योजनांच्या लाभार्थ्यांनाही अशाच प्रकारे



आर्थिक मागण्या सहन कराव्या लागत असल्याच्या तक्रारी सातत्याने येत आहेत. याशिवाय प्रशासकीय खरेदी, निविदा प्रक्रिया आणि बिले मंजुरीमध्येही कमिशनखोरी होत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला.

**'डोर-टू-डोर चौकशीशिवाय सत्य समोर येणार नाही''**

आमदार खोतकर यांनी सांगितले की, त्यांच्या मतदारसंघातील पंचायत समितीच्या कामकाजाबाबत अनेक तक्रारी प्राप्त झाल्यानंतर चौकशी समिती नेमण्यात आली आहे. मात्र, केवळ समिती नेमून उपयोग नाही. प्रत्येक लाभार्थ्याच्या घरी जाऊन प्रत्यक्ष चौकशी केल्याशिवाय वास्तव समोर येणार नाही. तसेच निधी वितरणाची प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्यासाठी ऑनलाइन निधी वितरण प्रणाली लागू करण्याचाही शासनाने गांभीर्याने विचार करावा, अशी मागणी त्यांनी केली.

**कार्यकारी अभियंत्यावरही गंभीर आरोप**

चर्चेदरम्यान आमदार अर्जुनराव खोतकरयांनी जालना जिल्ह्यासह राज्यातील पंचायत समित्यांमधील कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करत जिल्हा परिषद जालना येथील बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता सविता सालगर यांचे थेट नाव घेत त्यांचा गैर कारभार उजागर केला तसेच शेतकरी व सामान्य नागरिकांचे कुठलेही काम असेल तर अधिकाऱ्यांकडून लाभार्थ्यांकडे पैशांची मागणी केली जात असल्याचा गंभीर आरोप सभागृहात केला.

आमदार खोतकर यांनी जिल्हा परिषदेतील एका कार्यकारी अभियंत्यावरही गंभीर आरोप करत, संबंधित अधिकाऱ्याला तात्काळ निलंबित करून सखोल चौकशी करण्याची मागणी ग्रामविकास मंत्र्यांकडे केली. ग्रामीण विकास योजनांमधील भ्रष्टाचाराला जबाबदार असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला पाठीशी घालू नये, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी मांडली.

**ग्रामविकास मंत्र्यांची स्पष्ट ग्वाही**

या चर्चेला उत्तर देताना ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी हा विषय अत्यंत गंभीर असल्याचे मान्य केले. त्यांनी सभागृहात सांगितले की, प्रत्येक (पान २ वर)

# ....ही कोणती मुजोरी..?

...आपल्याकडे देवासमान मानले जात असेल तर तो मान डॉक्टरांना दिला जातो. सामान्य माणसासाठी डॉक्टर म्हणजे साक्षात देवदूत असतात. रुग्णाची अतिशय गंभीर स्थिती असताना सर्वसामान्यांना एकच आशेचा किरण असतो तो म्हणजे डॉक्टर. वैद्यकीय क्षेत्रातील नर्स, सेवक, हे सर्वच रुग्णांच्या सेवेत असतात. या सर्वांच्या सांघिक प्रयत्नाने गंभीरातील गंभीर रुग्णालाही जीवदान मिळते. मात्र या सर्वांचा आताच्या सत्ताधाऱ्यांना विसर पडला आहे. त्यांना सर्वकाही त्यांच्या तोंडातून शब्द बाहेर पडल्याबरोबर हजर हवे आहे. संस्कृतीचे माहेरघर म्हटल्या जाणाऱ्या डोंबिवलीत सध्या सत्ताधाऱ्यांची ही संस्कृती दिसून आली. केडीएमसी शास्त्रीनगर रुग्णालयात सत्ताधारी शिवसेनेचे नगरसेवक रमेश म्हात्रे आणि त्यांच्या आडदांड सहकाऱ्यांनी दोन डॉक्टर, नर्सेस आणि रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना बेदम मारहाण केली. एका अडलेल्या गर्भवतीची आणि बाळाची प्रकृती गुंतागुंतीच्या असल्यामुळे त्यांना अधिक चांगले उपचार मिळावे, या उद्देशाने आणि केडीएमसी शास्त्रीनगर रुग्णालयात अत्यावश्यक सेवेत जागा उपलब्ध नसल्यामुळे डॉक्टरांनी त्यांना अधिक चांगल्या रुग्णालयात जाण्याचा सल्ला दिला. मात्र म्हात्रे आणि टोळीला डॉक्टरांचा हा सल्ला त्यांचा अवमान करणारा वाटला. बस्सं, मग काय कल्याण-डोंबिवलीच्या शिवसैनिकांनी डॉक्टरांना शिवसेनेचा झटका दाखवला. कर्तव्यावर असलेल्या महिला आणि पुरुष डॉक्टरांना झोडपून काढण्यात आले. ज्येष्ठ परिचारिकांना धक्कबुक्की करण्यात आली. डॉक्टर द्वयींनी रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना दुसऱ्या दवाखान्यात जाण्याचा सल्ला का दिला. खरंच पालिकेच्या रुग्णालयात खाटांची उपलब्धता नव्हती तर त्याचे कारण काय, याचा जाब आरोग्य सभापती, पालिका आयुक्तांना विचारण्याऐवजी रुग्णसेवेत २४ तास खपणाऱ्या तरुण डॉक्टरांवर हात उचलणे यालाच शिवसेना स्टाईल म्हटले जात असेल तर आता या स्टाईलचा सुसंस्कृत डोंबिवलीकरांनीच रस्त्यावर उतरून विरोध केला पाहिजे. निषेध केला पाहिजे.

शिंदेंची शिवसेना राज्यापासून ग्रामपंचायतीपर्यंत सत्तेत आहे. या शिवसेनेत प्रवेशाचा निकष तसा नव्याने सांगण्याची गरज नाही. आमदार निवासातील कँटिनमध्ये टॉवेल बनियनमध्ये कर्मचाऱ्यांना मारता आलं पाहिजे. प्रकाशकांना आई-बहिणीवरून अर्वाच्च शिव्या घालता आल्या पाहिजे. पत्रकारांना शिवीगाळ करून ऑन कॅमेरा मारण्याची, धमकावण्याची ताकद असली पाहिजे. हीच जर शिवसेनेचा लोकप्रतिनिधी असण्यासाठीची पात्रता असेल तर रमेश म्हात्रे यांचा बायोडेटा यासाठी अगदी परिपूर्ण आहे. महिला डॉक्टरवरही हात उचलण्यात जो नगरसेवक मागेपुढे पाहत नाही, त्यांचा तर पक्षप्रमुखांनी, नगरविकास खात्याच्या मंत्र्यांनी जाहीर सत्कारच केला पाहिजे. पंचायतीपासून संसदेपर्यंत तुमची सत्ता असताना रुग्णालयांमध्ये सोयीसुविधा का नाहीत, याचा विचार हे असले लोकप्रतिनिधी कधी करू शकणार नाहीत. असे लोकप्रतिनिधी असणं हीच शिवसेनेची आणि सत्ताधारी पक्षांची आता गरज झाली आहे. मनी, मसल पॉवरवरच सत्तेचा डोलारा उभा राहिल्यावर सुसंस्कृत राजकारणाची अपेक्षा करणेच मुळात चुकीचे आहे. त्यामुळे सार्वजनिक सेवेतील डॉक्टर, अधिकारी आणि कर्मचारी यांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. गृहमंत्र्यांनीही आता हंटर हाती घेतला पाहिजे. हा आपला आणि तो त्यांचा असे वर्गीकरण करत बसण्याऐवजी जो गुन्हेगारी कृत्यात सापडत असेल त्याला योग्य शासन करण्याचा रामशास्त्रीबाणा त्यांनी दाखवण्याची वेळ आली आहे.

सत्ताधाऱ्यांची भाषा आणि कृती ही सुसंस्कृत, समंजसपणाच्या मर्यादा का ओलांडत आहे, हाही खरा प्रश्न आहे. अमर्याद सत्तेचा हा परिपाक आहेच, पण आपल्याला कोण जाब विचारणार, ही मुजोरीदेखील त्यासाठी जबाबदार आहे. आपला बॉस या ना त्या बंगल्यावर बसलेला आहे, याची पूर्ण जाणीव असल्यामुळेच डॉक्टर, नर्स, अधिकारी, कर्मचाऱ्यांवर हात उचलण्याची मजल लोकप्रतिनिधींची जात आहे. मात्र मुळात प्रश्न आहे की, पालिकेपासून संसदेपर्यंत सत्ता असल्यानंतर आणि सर्व पक्षप्रवेश हे विकासासाठी होत असताना सार्वजनिक रुग्णालय, पालिकेच्या दवाखान्यातील मूलभूत सोयी-सुविधांचा विकास का होत नाही. रुग्णालयात, अतिदक्षता विभागात खाटांची संख्या वाढवण्यासाठी, अत्याधुनिक यंत्र आणि त्यासाठीचे कर्मचारी भरतीसाठी या नगरसेवक, आमदार आणि खासदारांनी काय केले? याचा जाब यांना कधी विचारला जाणार. रुग्णालयात खाटांची, डॉक्टर, कर्मचारी वर्गाची संख्याच कमी असेल तर तिथे काम करणारे हे येणाऱ्या प्रत्येक रुग्णाची काळजी कशी घेऊ शकतील. त्यांच्याही काही मर्यादा आहेत, ज्याला सर्वस्वी हे सत्ताधारी जबाबदार आहेत. दोन रस्ते कमी बांधा पण शाळा, रुग्णालयांची संख्या वाढवा, असं म्हणणारा एक तरी लोकप्रतिनिधी आपल्याकडे सापडेल का? यांचा सर्वाधिक भर हा नगद नारायणावर आहे. टक्केवारीशिवाय एकही नस्ती हलत नाही. सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता या चक्रात सर्व सत्तासमीकरण अडल्यामुळे दोन दिवस अशा मुजोर लोकप्रतिनिधींविरोधात आंदोलन होईल, मात्र त्यांच्यावर कारवाईचा बडगा उगारण्याची हिंमत त्यांचे पक्षप्रमुख, राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री दाखवणार का? राज्याला गृहमंत्री आहेत हे दाखवून देण्याची वेळ देवेंद्र फडणवीस यांच्यावर आली आहे. काम करणाऱ्यांना मार आणि गुंडांचा सत्कार हे महाराष्ट्रात खपवून घेतले जाणार नाही, हे गृहमंत्र्यांनी खडसावून सांगितले पाहिजे, त्यांनी हे वेळीच केले नाही तर सुसंस्कृत राजकारणाचा गळा तुमच्या कार्यकाळात घोटला गेला, याचे पातक तुमच्या नावावर कायमचे लागल्याशिवाय राहणार नाही.



**ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले**
**मु.पो. मासा बेलेवाडी**
**कागल-कोल्हापूर**

## 'सर'प्रक्रियेस मुदतवाढ द्या; शिक्षकांऐवजी स्वतंत्र कर्मचारी नियुक्त करा

### मतदार वंचित राहू नयेत, जिल्हाधिकाऱ्यांना तय्यब देशमुख यांचे निवेदन

**जालना | प्रतिनिधी**

विशेष सघन पुनरिक्षण मोहिमेचा कालावधी अपुरा असून, कोणताही पात्र मतदार मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहू नये यासाठी या प्रक्रियेला मुदतवाढ द्यावी, तसेच या कामासाठी शिक्षकांची नियुक्ती न करता स्वतंत्र कर्मचारी नियुक्त करावेत, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) जालना शहर उपाध्यक्ष तय्यब बापू देशमुख यांनी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



निवेदनात म्हटले आहे की, जालना जिल्ह्यात ३० जून ते २९ जुलै या कालावधीत मोहीम राबविण्यात येत आहे. मात्र, अवघ्या ३० दिवसांत संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करणे व्यवहार्य नसल्याने नागरिकांना आवश्यक कागदपत्रे गोळा करण्यासाठी अधिक वेळ मिळावा, यासाठी मुदतवाढ देणे आवश्यक आहे. देशमुख यांनी निवेदनात नमूद केले आहे की, प्रक्रियेसाठी आधार कार्ड, मतदार ओळखपत्र, छायाचित्र आदी कागदपत्रांची पूर्तता करावी लागत आहे. ग्रामीण भागातील तसेच रोजंदारीवर काम करणाऱ्या नागरिकांना दिवसभराच्या कामानंतर ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. पावसाळा आणि शेतीच्या कामांचा हंगाम सुरू असल्याने शेतकरी व मजुरांनाही अडचणी येत आहेत.

प्रक्रियेसाठी शिक्षकांना म्हणून नियुक्त करण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामकाजावर परिणाम होत असल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला आहे. शिक्षकांनी अध्यापनावर लक्ष केंद्रित करावे आणि निवडणुकीसारख्या प्रशासकीय कामांसाठी स्वतंत्र कर्मचारी किंवा मनुष्यबळ नियुक्त करावे, अशी मागणी त्यांनी केली.

निवेदनात २००२ पूर्वीच्या मतदार नोंदींचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला आहे. ज्या नागरिकांच्या आई-वडिलांची नावे जुन्या मतदार यादीत उपलब्ध नसतील, अशा नागरिकांसाठी निवडणूक आयोगाने कोणती पर्यायी प्रक्रिया किंवा सुविधा उपलब्ध करून दिली आहे, याबाबत स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

अनेक ठिकाणी एका कुटुंबातील सदस्यांसाठी वेगवेगळे नियुक्त झाल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याचा आरोपही देशमुख यांनी केला आहे. कागदपत्रे जमा करण्यासाठी एका कडून दुसऱ्याकडे पाठविले जात असल्याने प्रक्रिया अधिक गुंतागुंतीची होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. शक्य असल्यास एका कुटुंबाची संपूर्ण प्रक्रिया एकाच मार्फत पूर्ण करण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी त्यांनी केली.

लोकशाहीमध्ये प्रत्येक पात्र नागरिकाला मतदानाचा अधिकार मिळणे आवश्यक असल्याचे नमूद करत, प्रक्रियेमुळे कोणताही पात्र मतदार मतदानापासून वंचित राहणार नाही, याची प्रशासनाने खात्री करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी नागरिकांच्या अडचणी लक्षात घेऊन प्रक्रियेला मुदतवाढ द्यावी, आवश्यक ते प्रशासनिक बदल करावेत आणि मतदार नोंदणी प्रक्रिया अधिक सुलभ करावी, अशी मागणी तय्यब बापू देशमुख यांनी केली आहे.

# ॥ पंढरीच्या वाटेवरती भक्त दंग झाले.॥

आषाढी एकादशी निमित्ताने पंढरपूरला निघणाऱ्या मुख्य व मानाच्या पालख्या व गावोगावच्या निघणाऱ्या पालख्या आता मार्गस्थ झाल्या आहेत.

संत निवृत्तीनाथ महाराज पालखी (त्र्यंबकेश्वर) त्र्यंबकेश्वर येथून पंढरपूरसाठी मार्गस्थ झाली आहे.

मुक्ताईची पालखी- जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर येथून या दिंडीचे प्रस्थान झाले आहे. संत सोपानदेव महाराज पालखी सासवडहून या सोहळ्याचे प्रस्थान आषाढी वारीसाठी होत आहे. जगद्गुरू संत तुकाराम महाराजांची पालखी देहू येथून पंढरपूरकडे निघाली आहे.तर संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी आळंदी येथून निघाली आहे. संत गजानन महाराज पालखी - शेगाव. संत एकनाथ महाराज पालखी - पैठण. संत चोखामेळा पालखी - मंगळवेढा. संत नामदेव महाराज पालखी - नरसी नामदेव.

इतर संतांच्या दिंड्या या मुख्य पालख्यांशिवाय अजून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून पांडुरंगाचे दर्शनासाठी निघाल्या आहेत.विशेष म्हणजे ह्या वर्षी लंडन हून निघालेली लंडन-पंढरपूर वारी ह्या सोबत सामिल झाली आहे. पंढरीची वारी आणि आषाढी एकादशीचा हा उत्साह महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अत्यंत पवित्र आणि मनमोहक भाग आहे. ज्ञानोबा-तुकोबांच्या नामाच्या गजरात, टाळ-मृदंगाच्या तालावर आणि भगव्या पताका फडकावत वारकरी जेव्हा पंढरीच्या वाटेवर चालतात, तेव्हा अवघे वातावरण भक्तिमय होऊन जाते. प्रत्येकाच्या मुखातून ज्ञानोबा माऊली तुकाराम आणि विठ्ठल विठ्ठल, जय हरी विठ्ठल'' असा अखंड जयघोष सुरू असतो. वारकऱ्यांच्या या भक्तीचा आणि वारीच्या प्रवासाचा महिमा शब्दांत सांगणे कठीण आहे. या विलोभनीय सोहळ्याची काही प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.नामजप आणि अभंग- वाटेवर चालताना थकवा जाणवू नये म्हणून वारकरी संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम महाराजांचे अभंग आणि हरिपाठ गातात. टाळ-मृदंग आणि वीणा या वाद्यांच्या निनादात संपूर्ण रस्ता दुमदुमून जातो आणि भक्तगण अगदी तल्लीन होऊन जातात. समरसता- वारीत जात-पात, श्रीमंत-गरीब असा कोणताही भेद नसतो. सर्वजण केवळ विठ्ठलाची लेकरे म्हणून एकत्र चालतात.दिंडी सोहळा- वेगवेगळ्या पालख्यांचे शिस्तबद्ध नियोजन, रिंगण आणि उड्यांचे खेळ,फुगडी, हे वारीचे मुख्य आकर्षण असते.




वारीच्या वाटेवर वारकऱ्यांच्या प्रचंड उत्साहाने आणि विठ्ठल नामाच्या गजराने खरोखरच अतिशय जल्लोषाचे, चैतन्यमय आणि प्रसन्न वातावरण तयार होते. वारी हा केवळ एक प्रवास नसून तो भक्तीचा आणि आनंदाचा एक महासोहळा आहे.या आषाढ महिन्यात संपूर्ण महाराष्ट्र विठ्ठलमय झाला असून वारीतील प्रसन्नता द्विगुणित करणारे काही मुख्य घटक खालीलप्रमाणे आहेत. भगव्या पताकांचा खेळ. वाऱ्याच्या तालावर फडकणाऱ्या भगव्या पताका संपूर्ण वाटेला ऊर्जेने भरून टाकतात. फुगड्या .आणि उड्या विसाव्याच्या ठिकाणी वारकरी खेळत असलेल्या फुगड्या आणि खेळ यामुळे थकवा पळून जातो आणि उत्साह वाढतो. भंडारा आणि बुक्का. कपाळावर लावलेला बुक्का आणि हवेत उडणारा भंडारा वातावरणात एक वेगळाच सुवास आणि पवित्रता आणतो. निःस्वार्थ सेवा. वाटेत ठिकठिकाणी अन्नदान आणि वैद्यकीय सेवा देणारे लोक पाहून मानवतेचे सुंदर दर्शन घडते. टाळ-मृदंगाचा तो नाद आणि वारकऱ्यांचा तो अद्भूत जल्लोष डोळ्यांसमोर आणला तरी अंगावर रोमांच उभे राहतात. वारी हा खरोखरच आनंद सोहळा आहे. ''हे सुख सोहळा स्वर्गी नाही'' असे वारीचे वर्णन संतांनी केले आहे. या प्रवासात भौतिक सुखांचा त्याग करून केवळ विठ्ठल भेटीच्या ओढीने आणि आनंदाने वारकरी मार्गक्रमण करत असतात.

वारीला आनंद सोहळा का म्हणतात, याची काही खास कारणे आहेत.आनंदाचे डोही आनंद तरंग- संसारातील सर्व चिंता, दुःख विसरून लाखो लोक एकत्र नाचतात, गातात आणि विठ्ठलमय होतात.परस्परांशी जिव्हाळ असतो. वाटेत भेटणारा प्रत्येक अनोळखी व्यक्ती ही माऊली असते. एकमेकांच्या पाया पडण्याची ही सुंदर संस्कृती केवळ इथेच पाहायला मिळते. निसर्गाची साथ असते. पावसाच्या हलक्या सरी, हिरवेगार रस्ते आणि हवेतील गारवा या आनंदात आणखी भर घालतात.अखंड ऊर्जा- शेकडो किलोमीटर चालूनही वारकऱ्यांच्या चेहऱ्यावर थकवा नसतो, तर फक्त विठ्ठल भेटीचा आनंद आणि उत्साह ओसंडून वाहत असतो.

पांडुरंगाचे भेटीसाठी निघालेल्या वारकऱ्यांचे वर्णन करणारा हा अभंग आहे.

पंढरीच्या वाटेवरती भक्त दंग झाले,नाचता नाचता सारे पांडुरंग झाले ।। धृ ।।

पंढरीच्या वाटेवरती भक्त दंग झाले
नाचता नाचता सारे पांडुरंग झाले..
टाळ चिपळ्यांच्या संगे मृदंग वाजती
एकमेकांना वैष्णव अबीर लावती
आनंदाचे डोहामधले ते तरंग झाले....
पंढरीच्या वाटेवरती भक्त दंग झाले..
जय जय विठ्ठल जय हरी विठ्ठल
हरी विठ्ठलाच्या गजरी हरपले भान
दिसू लागले डोळ्यांना सुंदर ते ध्यान..
भेटण्याला परब्रह्माला मन विहंग झाले...
पंढरीच्या वाटेवरती भक्त दंग झाले
एक एक दिंडी मिळूनी पालखी निघाली
वर्णभेद अभिमानाची वल्कले गळाली..
अंतरंग भागवतांचे.. एक रंग झाले झाले..

पंढरीच्या वाटेवरती भक्त दंग झाले

पंढरपूरच्या वारीला निघालेले वारकरी विठ्ठलाच्या भक्तीत पूर्णपणे बुडून (दंग होऊन) गेले आहेत. त्यांना आजूबाजूच्या जगाचे कोणतेही भान राहिलेले नाही.नाचता नाचता सारे पांडुरंग झाले. विठ्ठलाच्या नामाचा गजर करत नाचताना भक्तांचे स्वतःचे अस्तित्व संपून गेले आहे. भक्त आणि देव यांच्यातील अंतर मिटले असून, प्रत्येक वारकरी स्वतः विठ्ठलमय (पांडुरंग रूप) झाला आहे.विसरले देहभान, हरपली ही काया... विठ्ठलाच्या दर्शनाची ओढ आणि त्याचे प्रेम (माया) एवढी अथांग आहे की, वारकरी स्वतःचे शरीर (काया) आणि सर्व दुःख-थकवा विसरून गेले आहेत. टाळ आणि मृदंगाच्या तालावर पाय थिरकताना ते फक्त विठ्ठल रंगात न्हाऊन निघाले आहेत. घेऊन हाती टाळ, मुखी विठ्ठल विठ्ठल गाती...हातात टाळ घेऊन आणि मुखाने सतत विठ्ठल विठ्ठल असा जयघोष करत हे वारकरी पुढे चालत आहेत. चंद्रभागा नदीच्या तीरावर पोहोचताच त्यांचा आनंद द्विगुणित होतो आणि त्यांचे पाय आनंदाने थिरकू लागतात. भक्तीच्या या पवित्र रंगात सर्व वैष्णव (विठ्ठलभक्त) रंगून गेले आहेत. तुका म्हणे विठू माझा, मी विठूचा दास... विठ्ठल हाच माझा स्वामी आहे आणि मी त्याचा सेवक आहे. मनात फक्त आणि फक्त विठ्ठलाला भेटण्याची तीव्र इच्छा (ध्यास) आहे. ज्ञानोबा-तुकाराम असा जयघोष करत संपूर्ण वारी विठ्ठल नामात विलीन झाली आहे.थोडक्यात सांगायचे तर हे गीत वारीमधील अद्भूत आनंदाचे वर्णन करते. जेव्हा एखादा माणूस देवाच्या भक्तीत पूर्णपणे लीन होतो, तेव्हा तो देवापेक्षा वेगळा राहत नाही, तर तो स्वतः ईश्वराचाच एक भाग बनतो, हा अद्वैत भाव या गीतातून व्यक्त झाला आहे.

ज्ञानोबा माउली तुकाराम तुकाराम.. आणि विठ्ठल विठ्ठल या नामाच्या जयघोषाने संपूर्ण आकाश दुमदुमून जाते.

हातात टाळ, खांद्यावर मृदंग आणि वीणा घेऊन वारकरी संप्रदाय हरिनामाच्या रंगात न्हाऊन निघतो. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्या अभंगांचे गायन करत संपूर्ण मार्ग भक्तीमय होतो.

वारीच्या वाटेवर होणारे गोल रिंगण आणि उभे रिंगण हा डोळ्यांचे पारणे फेडणारा क्षण असतो. माउलींचा अश्व जेव्हा धावतो, तेव्हा वारकऱ्यांचा उत्साह शिगेला पोहोचतो. थकवा विसरून वृद्ध, तरुण आणि लहान मुले देखील वाटेत फुगड्या खेळतात आणि पाऊली नृत्याचा आनंद घेतात. वारीत कोणताही गरीब-श्रीमंत, उच्च-नीच असा भेद उरत नाही. सर्वजण एकमेकांच्या पाया पडतात आणि एकमेकांना माउली म्हणून हाक मारतात.

एकमेकांचे जड सामान वाहणे, आजारी वारकऱ्यांची सेवा करणे यातून निस्सीम मानवता सहकार्य दिसून येते. वारी ज्या ज्या गावांतून जाते, तिथले ग्रामस्थ वारकऱ्यांचे स्वागत करतात.

ठिकठिकाणी मोफत अन्नदान, चहा, पाणी आणि औषधोपचारांची सोय केली जाते. ही सेवा देणाऱ्यांना आणि घेणाऱ्यांना दोघांनाही आत्मिक आनंद मिळतो. अनेक दिवसांची पायी वाटचाल करून जेव्हा वारकरी पंढरपुरात पोहोचतात आणि चंद्रभागेत पवित्र स्नान करतात, तेव्हा त्यांचा सर्व शारीरिक थकवा क्षणात नाहीसा होतो.

विठुरायाच्या कळसाचे किंवा चरणांचे दर्शन झाल्यावर वारकऱ्यांच्या डोळ्यांतून वाहणारे अश्रू हे केवळ आणि केवळ ब्रह्मानंदाचे असतात.

वारीचा काळ हा पावसाळ्याचा असतो. हिरवीगार शेते, रिमझिम पाऊस आणि डोक्यावर तुळशी वृंदावन घेतलेल्या महिला वारकरी हे दृश्य निसर्गाचे सुंदर रूप दाखवते.

लाखो लोकांचा समुदाय असूनही वारीत कमालीची शिस्त पाहायला मिळते. प्रत्येक दिंडीला तिचा ठरलेला नंबर आणि जागा असते.

पाचव्या शतकातील ताम्रपटांमध्ये पंढरपूरचा उल्लेख आढळतो. वारीची नेमकी सुरुवात कधी झाली याबद्दल निश्चित तारीख नसली, तरी ती किमान ८०० वर्षे जुनी आहे.

संत ज्ञानेश्वर महाराजांचे वडील विठ्ठलपंत हे स्वतः आषाढ आणि कार्तिक महिन्यांत पंढरीची वारी करत असत. ज्ञानेश्वरांनी आपल्या ओव्यांमध्ये याचा उल्लेख केला आहे.

संत ज्ञानेश्वर आणि संत नामदेव (१३ वे शतक) या संतांनी वारीला व्यापक सामाजिक आणि धार्मिक स्वरूप दिले. त्यांनी समाजातील जातिभेद विसरून सर्वांना विठ्ठल भक्तीच्या एकाच मंचावर आणलेसंत तुकाराम आणि संत एकनाथांनी पुढे १४ व्या ते १७ व्या शतकात आपल्या अभंगांतून वारकरी संप्रदायाचा प्रचार केला आणि वारीची परंपरा अखंड सुरू ठेवली. दिंडी वारीचा आनंद हा केवळ एक प्रवास नसून तो महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक समृद्धीचा सर्वोच्च सोहळा आहे. दरवर्षी आषाढ महिन्यात विठू माउलीच्या दर्शनासाठी लाखो वारकरी टाळ-मृदंगाच्या तालावर पंढरपूरकडे पायी चालत निघतात. या वारीच्या वाटेवर मिळणारा निस्सीम आनंद आणि भक्तीचा सोहळा शब्दांत मांडणे कठीण आहे, तो अनुभवायला हवा.



दिलीप देशपांडे.
जामनेर. जिल्हा जळगाव.
८९९९५६६९१७

# कर्जमुक्तीपासून आर्थिक स्वावलंबनाकडे वाटचाल

शेती हा भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असून शेतकरी हा त्या व्यवस्थेचा केंद्रबिंदू आहे. मात्र, बदलते हवामान, नैसर्गिक आपत्ती, उत्पादन खर्चातील सातत्याने होणारी वाढ, बाजारभावातील अनिश्चितता आणि उत्पन्नातील अस्थिरता यामुळे अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडतात. या परिस्थितीत पीक कर्ज हे शेतकऱ्यांसाठी केवळ आर्थिक सहाय्य नसून शेतीच्या उत्पादन चक्राला गती देणारे महत्त्वाचे साधन ठरते. परंतु कर्जाची वेळेवर परतफेड न झाल्यास संबंधित शेतकरी बँकिंग व्यवस्थेपासून दूर जातात आणि पुढील हंगामासाठी नवीन कर्ज मिळविणे कठीण होते. अशा पार्श्वभूमीवर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ ही योजना शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्याबरोबरच त्यांना पुन्हा संस्थात्मक बँकिंग व्यवस्थेशी जोडणारा महत्त्वपूर्ण उपक्रम म्हणून समोर येत आहे.

पीक कर्जाचे महत्त्व आणि थकबाकीची समस्या

शेतीच्या प्रत्येक हंगामात बियाणे, खते, औषधे, सिंचन, मजुरी आणि यांत्रिकीकरणासाठी मोठ्या प्रमाणात भांडवलाची आवश्यकता असते. हे भांडवल बहुतेक शेतकरी पीक कर्जाच्या माध्यमातून उभे करतात. परंतु सलग दुष्काळ, अतिवृष्टी, अवकाळी पाऊस, रोगराई किंवा उत्पादनाला योग्य भाव न मिळाल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना कर्जाची वेळेवर परतफेड करणे शक्य होत नाही.

एकदा पीक कर्ज थकीत झाल्यानंतर संबंधित कर्जखाते अनुत्पादित मालमत्ता () होण्याचा धोका निर्माण होतो. त्याचा थेट परिणाम म्हणजे शेतकऱ्यांची पतक्षमता कमी होते आणि पुढील हंगामासाठी बँकांकडून नवीन कर्ज मिळण्यास अडथळे निर्माण होतात. परिणामी अनेक शेतकरी खासगी सावकारांकडून जास्त व्याजदराने कर्ज घेण्यास भाग पडतात. त्यामुळे कर्जाचे ओझे आणखी वाढून आर्थिक संकट अधिक गंभीर बनते.

कर्जमुक्ती योजनेचे व्यापक उद्दिष्ट

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ ही केवळ कर्जमाफीची योजना नसून शेतकऱ्यांचा आर्थिक पुनर्वसनाचा प्रयत्न आहे. या योजनेमुळे पात्र शेतकऱ्यांची थकीत कर्जखाती नियमित होण्यास मदत होईल. परिणामी त्यांना पुन्हा बँकांकडून पीक कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा होईल.

एकवेळ समझोता ()

या योजनेतील एकवेळ समझोता ( - ) ही अत्यंत महत्त्वाची तरतूद आहे. दोन लाख रुपयांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांनी निर्धारित अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर शासनाकडून निश्चित मर्यादेपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ दिला जाणार आहे.

या निर्णयामुळे बँकांनाही थकीत कर्जाची वसुली करण्याची संधी मिळेल आणि शेतकऱ्यांनाही आर्थिक पुनरुत्थानाचा मार्ग खुला होईल. त्यामुळे बँका आणि शेतकरी या दोघांच्याही हिताचा समतोल साधणारा हा व्यवहार्य पर्याय ठरू शकतो.

नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी प्रोत्साहन

योजनेतील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याची तरतूद. अनेकदा केवळ थकीत कर्जदारांनाच लाभ मिळाल्याची भावना वेळेवर कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये निर्माण होते. ही बाब लक्षात घेऊन आर्थिक शिस्त पाळणाऱ्या शेतकऱ्यांनाही शासनाकडून प्रोत्साहन देण्याचा निर्णय महत्त्वाचा ठरतो. यामुळे वेळेवर कर्जफेड करण्याची सकारात्मक मानसिकता निर्माण होईल, आर्थिक शिस्तीला बळ मिळेल आणि बँकिंग क्षेत्रात नियमित कर्जदारांची संख्या वाढण्यास मदत होईल.

बँकिंग व्यवस्थेला होणारे फायदे

या योजनेचा लाभ केवळ शेतकऱ्यांनाच नव्हे तर बँकिंग व्यवस्थेलाही होणार आहे. थकीत कर्जाची वसुली झाल्यामुळे बँकांच्या अनुत्पादित कर्जांमध्ये () काही प्रमाणात घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे बँकांची आर्थिक स्थिती अधिक सक्षम होईल आणि पात्र शेतकऱ्यांना नव्याने कर्जपुरवठा करण्याची क्षमता वाढेल.

आर्थिक शिस्त कर्जमुक्ती म्हणजे सर्व आर्थिक समस्या संपल्या असा समज करून घेणे योग्य ठरणार नाही. ही योजना शेतकऱ्यांसाठी नव्याने आर्थिक शिस्तीची सुरुवात करण्याची संधी आहे. कर्जमुक्तीनंतर पुन्हा कर्जाच्या चक्रात अडकू नये यासाठी आर्थिक नियोजन अत्यंत आवश्यक आहे.

शेतकऱ्यांनी पुढील बाबींवर विशेष भर देणे गरजेचे आहे.

पीक नियोजन आणि हवामानानुसार पीक पद्धतीचा अवलंब.

उत्पादन खर्चाचे नियोजनबद्ध व्यवस्थापन.

पीक विमा योजनांचा नियमित लाभ.

उत्पन्नातून बचतीची सवय निर्माण करणे.

वेळेवर कर्जफेड करून पतक्षमता टिकवून ठेवणे.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादनक्षमता वाढविणे.

बाजारपेठेतील बदलांचा अभ्यास करून योग्य वेळी विक्री करणे.

ही आर्थिक शिस्त दीर्घकालीन स्थैर्य निर्माण करण्यासाठी अत्यावश्यक आहे.

ग्रामीण अर्थव्यवस्थेला मिळणारी नवी ऊर्जा

कर्जमुक्तीमुळे शेतकऱ्यांच्या हातात पुन्हा आर्थिक प्रवाह निर्माण झाल्यास त्याचा सकारात्मक परिणाम संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो. शेतीसाठी आवश्यक निविष्ठांची खरेदी वाढेल, कृषी व्यवसायांना चालना मिळेल, रोजगारनिर्मितीला हातभार लागेल आणि ग्रामीण बाजारपेठेतील व्यवहारही वाढतील.

**अरुण सुर्यवंशी**
**जिल्हा माहिती अधिकारी**
**जालना**

# प्रभाग क्रमांक ८ मधील स्वच्छता व नाला प्रश्नांवर आयुक्त अंजली शर्मा यांची पाहणी

नगरसेवक दुर्गेश काठोठीवाले यांच्या पाठपुराव्यानंतर संग्रामनगर व दर्गावेस परिसरातील कामांना तातडीचे आदेश

**जालना । प्रतिनिधी**

जालना महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक ८ मधील स्वच्छता, नाल्यांची दुरवस्था आणि नागरिकांच्या विविध नागरी समस्यांची मनपा आयुक्त अंजली शर्मा यांनी प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित विभागांना तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश दिले.



प्रभागातील विविध समस्या सातत्याने नागरिकांकडून समोर येत असल्याने नगरसेवक दुर्गेश काठोठीवाले यांनी आयुक्त अंजली शर्मा यांना प्रत्यक्ष परिसराची पाहणी करण्याची विनंती केली होती. त्यानुसार आयुक्तांनी प्रभागातील विविध भागांना भेट देत नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. पाहणीदरम्यान संग्रामनगर परिसरातील नाल्याची साफसफाई व रुंदीकरण तातडीने करण्यात यावे, तसेच दर्गावेसलोधी मोहल्ला परिसरातील नाल्याची तात्काळ साफसफाई करून पावसाचे पाणी सुरळीत वाहून जाण्याची व्यवस्था करावी, असे स्पष्ट निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.

यावेळी प्रभागातील स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते, जलनिस्सारण व्यवस्था तसेच पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या अडचणींबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. नागरिकांनीही विविध समस्या आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिल्या. त्यावर संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या.

या पाहणीवेळी नगरसेवक दिनेश भगत, अमोल धानोरे, नरेश (भैय्या), लक्ष्मण वर्मा, अर्जुन फते लष्करी, विकी सेनानी, नितीन जांगळे, लखन फते *(पान २ वर)*

# श्रद्धा, सेवा आणि संकल्पाची प्रेरणादायी गाथा; जालन्याच्या सोनू महाराज जोशी यांचा बाबा रामदेवरासाठी १५५१ किमी पदयात्रेचा संकल्प

१५ ऑगस्टपासून जालना ते रामदेवरा पायी प्रवास; भक्ती, समाजसेवा आणि राष्ट्रकल्याणाचा संदेश देणारी अनोखी यात्रा

**जालना । प्रतिनिधी**

दृढ श्रद्धा, अखंड भक्ती, सेवाभाव आणि जिद्दीच्या बळावर अशक्य वाटणारी ध्येयेदेखील गाठता येतात, याचे प्रेरणादायी उदाहरण जालना येथील सोनू महाराज जोशी यांनी घालून दिले आहे. राजस्थानातील लोकदैवत श्री बाबा रामदेवजी महाराज यांच्या दर्शनासाठी त्यांनी १५ ऑगस्ट २०२६ रोजी जालना येथील गायत्री नगरातून तब्बल १५५१ किलोमीटरच्या पदयात्रेचा संकल्प केला आहे. ही यात्रा केवळ धार्मिक नसून समाजात श्रद्धा, सेवा, संयम,



सकारात्मकता आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणारा प्रेरणादायी उपक्रम ठरणार आहे. सोनू महाराज जोशी गेल्या अनेक वर्षांपासून बाबा रामदेवजींचे निष्ठावान भक्त आहेत. विविध धार्मिक स्थळांच्या यात्रांसह समाजोपयोगी कार्यातही त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. आता ते जालना ते राजस्थानातील पवित्र रामदेवरा धाम असा प्रदीर्घ पायी प्रवास करून आपल्या संकल्पाची पूर्तता करणार आहेत. अनेक दिवस चालणाऱ्या या यात्रेदरम्यान ते विविध राज्यांतून पायी प्रवास करत भाविकांशी संवाद साधणार असून, श्रद्धा, सद्भावना आणि सेवाभावाचा संदेश देणार आहेत.

**भक्तीचा प्रवास अनेक वर्षांपासून अखंड सुरू**

सोनू महाराज यांची बाबा रामदेवजींवरील श्रद्धा ही आजची नसून अनेक वर्षांची आहे. २०११ ते २०२४ या कालावधीत त्यांनी जोधपूर ते रामदेवरा अशी सुमारे २१० किलोमीटरची पदयात्रा सातत्याने पूर्ण केली आहे.

यानंतर २०२५ मध्ये त्यांनी जालना येथून मध्य प्रदेश, गुजरात, हरियाणा आणि राजस्थान असा सुमारे ३१०० किलोमीटरचा मोटारसायकल प्रवास अवघ्या सात दिवसांत पूर्ण करून विविध तीर्थक्षेत्रांना भेट दिली. धार्मिक कार्यासोबतच समाजसेवेलाही *(पान २ वर)*

# प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड यांचे सुपुत्र अर्णव कऱ्हाड यांचे वकील होण्याचे स्वप्न साकार

**दापोली - प्रतिनिधी**

: वराडकर-बेलोसे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड यांचे धाकटे सुपुत्र अर्णव कऱ्हाड यांनी मुंबईतील प्रतिष्ठित गव्हर्नमेंट लॉ कॉलेजमधून एलएल.बी.ची पदवी यशस्वीपणे पूर्ण केली आहे. कायद्याच्या क्षेत्रात करिअर करण्याच्या त्यांच्या वाटचालीतील हा महत्त्वाचा टप्पा असून, त्यांच्या यशाबद्दल दापोली परिसरातून अभिनंदन होत आहे.



तीन वर्षांपूर्वी एमएच सीईटी लॉ तीन वर्षे अभ्यासक्रमाच्या प्रवेशपूर्व परीक्षेत अर्णवने मुलांमध्ये प्रथम क्रमांक पटकावला होता. या उल्लेखनीय गुणवत्तेच्या जोरावर त्याला मुंबईतील गव्हर्नमेंट लॉ कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला.

इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेतलेल्या अर्णवने सायन्स शाखेतून बीएससी पूर्ण केली. त्यानंतर एमएससीकडे न वळता स्वतःच्या आवडीनुसार कायद्याचे क्षेत्र निवडले. डॉ. भारत कऱ्हाड स्वतः सीए असून त्यांचे ज्येष्ठ सुपुत्रही सीए आहेत. त्यामुळे अर्णवनेही सीए व्हावे, अशी वडिलांची इच्छा होती. मात्र, त्याने कायद्याच्या शिक्षणाला प्राधान्य दिले आणि कुटुंबानेही त्याच्या निर्णयाला पूर्ण पाठिंबा दिला.

अर्णवला वक्तृत्व आणि ड्राफ्टिंगची विशेष आवड असून इंग्रजी भाषेवर त्याचे चांगले प्रभुत्व आहे. लोकांशी सहज संवाद *(पान २ वर)*

# आमदार रोहित पवार यांच्या आंदोलनाचे यश

कांद्याच्या वाढीव दराचा कर्जत-जामखेडला १८७ कोटी रुपयांचा लाभ

**कर्जत-जामखेड - प्रतिनिधी**

कांद्याच्या पडलेल्या दराविरोधात आमदार रोहित पवार यांनी राज्यभर केलेल्या आंदोलनाचा कर्जत-जामखेडमधील शेतकऱ्यांनाही फायदा झाला असून आंदोलनामुळे वाढलेल्या कांद्याच्या दरामुळे तब्बल १८७ कोटी रुपयांचा अधिकचा लाभ येथील शेतकऱ्यांना झाला आहे. लढा एका मतदारसंघाच्या आमदाराचा असला तरी कर्जत-जामखेडसह संपूर्ण राज्यातील शेतकऱ्यांना या वाढीव दराचा फायदा झाल्याने



शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

कर्जत आणि जामखेड या दोन्हीही तालुक्यातील शेतकरी कांद्याच्या लागवडीकडे मोठ्या प्रमाणात वळला असला तरी अनिश्चित दरामुळे शेतकऱ्यांच्या पदरी निराशा येत असल्याचेच गेल्या काही काळात दिसून येत आहे. आत्ताचा विचार करायचा झाला तर गत हंगामात कांद्याच्या दराने निच्चांकी पातळी गाठली आणि बाजारात कांदा विक्रीसाठी आणल्यानंतर त्यातून चार पैसे मिळण्याऐवजी वाहतूक खर्चही स्वतःच्या खिशातून करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली होती. उत्पादन खर्च वसूल होण्याचा विषय तर बाजूलाच राहिला. यातूनच शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ येऊन ठेपली आणि राज्यात काही भागात तर शेतकऱ्यांनी गळफास लावून या जगाचा निरोप घेतल्याच्या घटनाही मधल्या काळात घडल्या. या दुष्टचक्रातून शेतकऱ्याला बाहेर काढण्यासाठी आमदार रोहित पवार यांनी थेट रस्त्यावर उतरत सरकारला जाब विचारण्यास सुरवात केली. आंदोलनाच्या घोषणेपूर्वी ७०० रु. ते ८०० रुपये प्रति क्विंटल या भावाने कांदा विकावा लागत होता, पण आंदोलनाची घोषणा करताच केंद्र सरकारने १२०० रुपये प्रती क्विंटल हमीभावाने नाफेडच्या माध्यमातून कांद्याची खरेदी करण्याची *(पान २ वर)*

# इंग्लिश चॅनेलला गवसणी घालणाऱ्या 'जलपरी' गीता मालुसरे आज मुंबईत उत्साहाने स्वागत

**जालना- प्रतिनिधी**

जागतिक जलतरण क्षेत्रातील अत्यंत अवघड मानली जाणारी इंग्लिश खाडी पोहून पार करण्याचा ऐतिहासिक पराक्रम करणारी कुमारी गीता महेश मालुसरे आज भारतात परत आली, मुंबई विमानतळावार तिचे स्वागत करण्यासाठी मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईचे अध्यक्ष रवींद्र मालुसरे, शिवसेना उबाठा पक्षाचे दक्षिण मुंबई उपविभाग प्रमुख बाजीराव मालुसरे, महेशदादा मालुसरे यांचे कुटुंबीय, आदेश बाजीराव मालुसरे, अभिनेता कौस्तुभ केणी, कोच शेखर खासनीस उपस्थित होतो. पुण्यात पोहोचल्यानंतरही तिचे जोरदार स्वागत झाले.



रत्नागिरी येथील सागरी स्पर्धेत पोहत असताना गीताला जेलीफिश या विषारी जलचराचा तीव्र दंश झाला होता. तिचा हात निकामी होण्याचा धोका निर्माण झाला होता. हात वाचवण्यासाठी व वेदनांवर मात करत त्यांना तब्बल ११ शस्त्रक्रिया सहन कराव्या लागल्या होत्या.आपले स्विमिंग करिअर संपले असे वाटत असताना दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर गीताने पुन्हा एकदा पाण्यात उतरून हा पराक्रम केला आहे. इंग्लडमध्ये प्रॅक्टीस करताना जेली फीशने पुन्हा एकदा गीताला दंश केला होता. सुदैवाने हा दंश विशारी नव्हता.

मात्र इंग्लिश खाडीत पोहत असताना जुन्या जखमांच्या वेदना ठणकत होत्या, जीवघेण्या जेलीफिश दंशाचे मानसिक दडपणही होते, मात्र असह्य वेदनांना विसरून ती फक्त आपल्या ध्येयाकडे पुन्हा झेपावत राहिली.आपले लक्ष फक्त स्वप्नावर केंद्रित केले आणि अखेर तीने इतिहास रचला. इतका संघर्ष करून मिळवलेले हे यश जगाच्या पाठीवर खरोखरच एकमेवाद्वितीय आहे. गीताने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मिळवलेले हे यश जगभरात कौतुकास पात्र ठरले आहे.

वयाच्या अवघ्या तिसऱ्या वर्षापासून पोहायला सुरुवात केली होती. वयाच्या १३ व्या वर्षी 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' हा संदेश देण्यासाठी गीताने मुंबईतील प्राँग्ज लाइट हाउस ते गेट वे ऑफ इंडिया ते वाशी खाडी पूल हे समुद्रातील ३१ किलोमीटर अंतर अवघ्या ४ तास ५५ मिनिटांत पोहून पार केले होते. २०२२ मध्ये इस्त्राईलला झालेल्या स्पर्धेत दुसरी आली होती. रत्नागिरी मध्येही ती अपघात होऊनही दुसरी आली होती.

इंग्लिश चॅनेल चे अंतर ३५ किलोमीटर आहे मात्र समुद्रातील आव्हानात्मक लाटांमुळे गीता प्रत्यक्ष पोहताना हे अंतर ५४ किलोमीटर झाले हे अंतर तिने १४ तास ३१ मिनिटांत पोहून पूर्ण केले. इंग्लिश चॅनेलचे अंतर पार केल्यानंतर यापुढे थांबायचे नाही असे गीताने ठरवले आहे. या वर्षी येणाऱ्या ऑगस्टमध्ये न्यूयॉर्कमधील ४६ किलोमीटरची 'ट्रेंटी ब्रिजेस' आणि सप्टेंबरमध्ये कॅलिफोर्नियातील ३२ किलोमीटरची 'कॅटेलिना चॅनेल' पार करण्यासाठी आत्ता सज्ज झाली आहे. गीताला जागतिक कीर्तीचा 'क्वीन ऑफ ओशन' हा बहुमान मिळवण्याचा आहे. जगातील सात प्रमुख खाड्या पोहायच्या असून, या 'सेव्हन ओशन चॅलेंज' स्वीकारण्यास तीने धडाक्यात सुरुवात केली आहे.

# उपवर्गीकरण प्रक्रियेच्या विरोधातील जाफ्राबाद येथील बेमुदत साखळी उपोषणास उत्स्फूर्त प्रतिसाद

*सामुदायिकरित्या दर दिवशी एक-एका गावातील उपोषणकर्ते साखळी उपोषणात होतात सहभागी*

**दत्ता देशमुख**

अनुसूचित जाती (एससी) आरक्षणाच्या अ.ब.क.ड उपवर्गीकरणाच्या विरोधात महाराष्ट्रभर सुरू असलेल्या जन आंदोलनाला जाफ्राबाद तालुक्यातही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये उपवर्गीकरणाच्या विरोधात सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जाफ्राबाद तालुक्याच्या वतीने समस्त बौद्ध समाज व अनुसूचित जातीतील विविध समाज घटकांच्या नेतृत्वाखाली दिनांक १८ जून २०२६ पासून तहसील कार्यालय,जाफ्राबाद येथे बेमुदत साखळी उपोषण सुरू आहे.



आंदोलकांचे म्हणणे आहे की,अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याच्या प्रक्रियेमुळे भारतीय संविधानाने अनुसूचित जातींना प्रदान केलेल्या सामाजिक न्याय,समता आणि आरक्षणाच्या मूलभूत तत्त्वांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. तसेच या प्रक्रियेमुळे अनुसूचित जातींमध्ये मतभेद निर्माण होऊन सामाजिक ऐक्याला बाधा पोहोचू शकते.

या आंदोलनाद्वारे शासनाकडे पुढील प्रमुख मागण्या करण्यात येत आहेत :

१.अनुसूचित जाती (एससी) आरक्षणाचे अ.ब.क.ड उपवर्गीकरण तात्काळ रद्द करण्यात यावे.२.अनुसूचित जातींचे घटनात्मक हक्क अबाधित ठेवून विद्यमान संविधानिक आरक्षण व्यवस्थेचे संरक्षण करण्यात यावे.३.अनंत बदर समितीने राज्यातील सर्व अनुसूचित जाती घटकांचा समावेशक व प्रत्यक्ष अभ्यास केलेला नसल्याचा आंदोलकांचा आरोप *(पान २ वर)*

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६**, E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.